# भारतीय संविधान साक्षरतेचा जागर !

JOTIRAM VILAS MANE
M.phil student

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 जयंतीचे औचित्य साधून भारतभर ' 26 नोव्हेंबर ' हा हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा होतोय. दिनांक 26 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर 2018 हा संविधान हा सप्ताह म्हणून साजरा करुन भारतीय संविधानाचा गौरव केला जात आहे. भारतीय संविधानाचे संरक्षण हे ख-या अर्थाने समाजाच्या सामाजिक आणि नैतिक जाणिवेतच आहे.

भारतीय संविधानाचे संरक्षण आणि राज्यघटनेचा कालपरत्वे विकास होण्यासाठी शासन व न्यायव्यवस्था जेवढी कटीबध्द आहे तेवढयाच प्रमाणात जनता आपल्या हक्काबदद्ल व अधिकाराविषयी जागरुक तसेच कर्तव्यांबदद्ल सजग असली पाहिजे. वेळप्रसंगी सनदशीर मार्गाने जनआंदोलन करण्यास तत्पर असणारा समाजच संविधानातील मूलतत्वांचे संरक्षण आणि संवर्धन करु शकेल. यामुळेच लोकशाहीचा हेतू अधिक सफल होण्यात मदत होईल. लोकशाही अधिक यशस्वी आणि समृध्द बनण्यास नक्कीच मदत होईल.

भारतीय राज्यघटनेचा लौकीक जगभरात आहे. राज्यघटनेचे विविध पैलू उलगडून सोप्या भाषेत जनसामान्यात पोहचविणे गरजेचे आहे. जनतेची संविधान विषयी ज्ञानार्जनाची भूक भागविण्यास मदत होईल. भारतातील दृष्टीहीन बांधवांना संविधान वाचता यावे या उददेशातून भारतीय राज्यघटना आता ब्रेल लिप मध्ये तयार केली आहे. यामुळे सामान्य माणसाचे आत्मभान जागृत होवून त्यांच्यामध्ये संविधानप्रती खरी निष्ठा व श्रध्दा बाळगण्यास मदत होईल.

राज्यघटना म्हणजे असा दस्तऐवज की, ज्यामध्ये शासन व्यवस्थेची रुपरेषा, शासन, प्रशासन आणि जनता यांच्या परस्पर संबंधाचे वर्णन करणारे कायदे व नियमांचे संग्रह असतो. राज्यघटना ही शासन संस्थेच्या मूलभूत कायदा आहे. मे 1946 मध्ये जाहीर करण्यात आलेल्या कॅबिनेट मिशन प्लॅन नुसार संविधान सभेची निर्मिती करण्यात आली. भारताच्या संविधान सभेत सदस्य संख्या 299 होती जवळपास 10 लाख

लोकसंख्येमागे 1 सदस्य असे प्रमाण ठेवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारताच्या राज्यघटना निर्मितीसाठी मसुदा समितीची 29 ऑगस्ट 1947 रोजी स्थापना केली. या समितीने अनेक बैठका व चर्चासत्रानंतर 4 नोव्हेंबर 1948 रोजी घटनेचा अंतिम मसुदा संविधान सभेपुढे मांडला. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद होते. संविधान सभेत भारतातील सर्वच स्तरातील लोकांना प्रतिनिधित्व मिळाले होते. संविधान सभेच्या सूचना कायदेशीर भाषेत शब्दबध्द करणे. जगभरातील जवळपास 60 देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करुन भारतासाठी उपयुक्त ठरणारी घटना निर्मितीचे अव्दितीय कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. म्हणूनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते.

मसुदा समितीने सादर केलेला अंतिम अहवाल संविधान सभेने 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्विकारला. त्याच दिवशी उपस्थित असलेल्या 284 सदस्यांनी घटनेवर स्वाक्ष–या केल्या. याच दिवशी भारतीय जनतेच्या वतीने संविधान सभेने घटना अंगीकृत व अधिनियमित करून स्वत: प्रत अर्पण केली. भारतीय राज्यघटना निर्मितीचा कालावधी 2 वर्षे 11 महिने 18 दिवस एवढा होता. 26 जानेवारी 1950 पासून अंमलात आलेल्या भारतीय राज्यघटनेत सध्या 1 प्रास्ताविका, 25 भाग, आणि 12 अनुसुचिंचा तसेच जवळपास 459 कलमांचा समावेश आहे.

सर्व भारतीयांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी देणारे भारतीय संविधान आहे. भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा संकल्प आहे. संविधानाच्या उददेश पत्रिकेत स्वातंत्र्य, दर्जाची व संधी समता, प्रतिष्ठेची हमी देणारी बंधुता तसेच सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय यांची अपेक्षा केली आहे. भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी व विस्तृत स्वरूपाची राज्यघटना आहे. भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, केंद्रीय कार्यकारी मंडळ, संसदीय शासन व्यवस्था, सर्वोच्च न्यायव्यवस्था, राज्यकार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, केंद्र–राज्य संबंध यांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. इतर राष्ट्रांतील घटनांच्या तुलनेच भारतीय राज्यघटना अधिक विस्तृत स्वरूपाची

आहे. भारतीय संविधानाची निर्मिती करताना भारतातील विविध जाती, धर्म व संस्कृती यांचा सारासार विचार केला आहे.

जगाला आदर्श वाटणारी भारतीय राज्यघटना भारतातील तळागाळातील सर्वच स्तरातील जनतेपर्यंत पोहचविणे निकडीचे आहे. यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, तसेच विविध संघटना यांनी पुढाकार घेणे अगत्याचे वाटते. संविधान साक्षरता मोहिम, संविधान जागृती मोहिम, तसेच संविधानावर विविध चर्चासत्रे, व्याख्याने आयोजित करणे यासारख्या उपक्रमातून लोकांना भारतीय संविधान ज्ञात होण्यात मदत होईल. यासाठी शासनाची मध्यवर्ती भुमिका असली पाहिजे.

भारतीय संविधान माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी उपलब्ध करुन देते. समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. मानवाचे हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन व त्यांचा प्रसार करण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या साक्षरतेची गरज आहे. यामुळे जनता, शासन व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय निर्माण होवून राज्यात शांतता व स्थैर्य निर्माण होईल. जनतेला कायदयाच्या मात्रेची गरजच राहणार नाही. यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकास साधण्यास मदत होईल.

सर्वांची साथ, सर्वांचा विकास या संकल्पनेस मूर्त स्वरुप प्राप्त होण्यासाठी भारतीय संविधानाचा सर्वत्र प्रसार व प्रचार होणे अगत्याचे वाटते. भारतीय राज्यघटना संपूर्णपणे अंमलात आणली गेल्यास पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल असे म्हणणे अतिशयक्तीचे ठरणार नाही.

सक्षम नागरिकांशिवाय सक्षम शासन निवडता येणार नाही. शासन व लोकप्रशासन अधिक पारदर्शकपणे उत्तरदायीत्वाने वागण्यासाठी लोकांनी राज्यघटना अवगत केलेली पाहिजे. भारतीय राज्यघटनेचे भविष्य अधिक उज्वल होवून चिरकाल टिकवण्यासाठी घटनेची मूल्ये तत्वे जनेतेबरोबर शासनाच्या विचारात व कृतीत अधिक खोलवर रुजलेली असणे गरजेचे आहे. शासनव्यवस्था व जनता यांचे परस्पर संबंध सहकार्याचे दोघांतील आंतरक्रिया ज्यावेळी विश्वास पूर्ण होईल त्याचवेळी समाजाच्या सामाजिक आर्थिक व राजकीय विकास साधणे शक्य होईल.

भारतीय राज्यघटने विषयाच्या अज्ञानेतून दिल्लीतील जंतरमंतर मैदानात काही महिन्यापूर्वी भारतीय राज्यघटनेच्या प्रती जाळण्याचा प्रकार झाला. ते अतिशय निंदनीय स्वरुपाचे कृत्य आहे. भारतीय लोकशाहीत भारतीय संविधानाप्रती ज्यांना अनास्था वाटते त्यांना भारतीय राज्यघटनेची खरी तत्वे उमगलीच नाहीत असे वाटते. भारतीय संविधानाप्रती निष्ठा, बांधिलकी, जिव्हाळा, आपुलकी व आस्था, श्रध्दा निर्माण करण्यासाठी तसेच भारतातील लोकांचा घटनेवरील अधिक विश्वास वाढवण्यासाठी व संविधानेचे खरे रुप लोकांना समजण्यासाठी संविधान साक्षरतेचा जागर हा झालाच पाहिजे. भारतातील किती लोकांना राज्यघटना माहित आहे? किती लोकांत भारतीय संविधानाबदद्ल सजगता आलेली आहे? यांचा सारासार विचार होवून योग्य ती पावले वेळीच उचलून भारतीय राज्यघटनेची जागृकता अधिक गतिशील बनविणे फायदयाचे ठरणार आहे. यासाठी संविधान रॅली, संविधान गौरव सोहळा, संविधान साक्षरता मोहिम, यांसारखे अनेक उपक्रम राबविणे फलदायी ठरणार आहे.

भारतीय राज्यघटनेची साक्षरता वाढविण्यासाठी एक साखळीबध्द जनचळवळ उभी व्हावी. लोकजागृतीशिवाय भारतीय लोकशाहीला अधिक मजबुती येणार नाही. या जनजागृतीतून संविधान, कायदा, सार्वभौमत्व लोकशाही उन्नत राखण्यास मदत होईल. संविधानाच्या साक्षरतेमुळे सर्वत्र संपूर्ण विश्वासर्हत, शासन, प्रशासन व जनता यांच्यात स्नेहसंबंध, सहकार्य, समन्वय व संयुक्त कृतीस अधिक प्रोत्साहन मिळेल. हे सार्वजनिक हितार्थ ठरेल. भारतीय राज्यघटनेची साक्षरता ही एक काळाची गरज आहे. या माध्यातातून संविधनाचा जागर झालाच पाहिजे.

प्रा.जोतिराम विलास माने

सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग

सांगोला महाविद्यालय सांगोला

मो. 9834561732

ई–मेल : jotiramvmane82@gmail.com

संदर्भ

1. भारतीय राज्यघटना – रंजन कोळंबे

2- www.google.com

3. www.loksatta.com